**अत्यंत तातडीचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018
क्र.मातवि/ ४ /कावि/३९/2021
दिनांक- २७/ ९ /2021

**विषय:- मनपा संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...**

**संदर्भ:-** 1) संकिर्ण२०२१/प्र.क्र.७/(५७४७/२०२१)/आस्था, दि. २५.०८.२०२१
2) पीसीसी-2021/सं.क्र.862/नवि-22, दिनांक 14/07/2021 व
3) माहिती तंत्रज्ञान विभागाकडील परिपत्रक क्र.मातवि/8/कावि/25/2021, दिनांक- 08 / 03 /2021
4) परिपत्रक क्र.मातवि/4/कावि/18 /2021, दि. 27/08/2021
5) शासन निर्णय क्र. प्रसूधा-1119/प्र.क्र.-3/18अ, दि. 03/02/2021

**परिपत्रक,**

महापालिकेमार्फत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ची अंमलबजावणी करीत नसलेबाबत तसेच कामकाजाची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करत नसलेबाबत नागरिकांनी तक्रार केलेली आहे. तसेच उपरोक्त संदर्भिय क्र. १ व २ अन्वये मा. राज्य माहिती आयोग व नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांनी संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करणेबाबत उचित कार्यवाही करून संबंधितांस कळवावे व आयोगास त्याबाबतचा पुर्तता अहवाल सादर करावा याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यादृष्टीने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम(६०) मधील तरतुदीनुसार मनपातील विविध विभागांनी मनपा संकेतस्थळावर माहितीचे प्रकटीकरण करणे तसेच विविध माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI बाबतची माहिती, विभागाशी संबंधित विविध माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणे आवश्यक आहे. तथापी काही विभागांकडुन सदरची माहिती प्रसिद्ध / अद्ययावत केली जात नसुन ज्या विभागाची माहिती प्रसिद्ध / अद्ययावत केली जात नाही अशा विभागांमधील विभागप्रमुखांवर योग्य ती कारवाई करणेबाबत कळविलेले आलेले होते.

त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. ३ व ४ अन्वये सर्व संबंधित विभागांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे संकेतस्थळावर नागरिकांना मनपाचे विविध विभागांची माहिती सहजपणे उपलब्ध होणेकामी माहितीचे प्रकटीकरण तसेच निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI अंतर्गत कलम-4 नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती तसेच विभागाशी संबंधित विविध प्रसिद्ध करावयाची माहिती त्वरित प्रसिद्ध / अद्ययावत करणेकामी कळविणेत आलेले होते. तथापि, बहुतांश विभागांनी तद्नंतरही आपले विभागाशी संबंधित माहिती मनपा संकेतस्थलावर प्रसिद्ध / अद्ययावत केलेली नसल्याचे निदर्शनास येत आहे.

(कृपया मागे पहा)

तसेच उपरोक्त संदर्भिय क्र. ५ अन्वये चे शासन निर्णयानुसार **"राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता (प्रगती) अभियाना"** अन्वये माहितीच्या अधिकारांतर्गत स्वयंप्रकटन दृष्टीने जास्तीत जास्त माहिती मनपा संकेतस्थळावर प्रकाशीत करणे आवश्यक आहे.

तरी सदर परिपत्रकान्वये सर्व संबंधित विभागांना कळविणेत येते की आपण आपले विभागाशी संबंधित मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली सर्व माहिती **(उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI अंतर्गत कलम-4 नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती, विभागाशी संबंधित प्रसिद्ध करणेत आलेली विविध माहिती )** तपासुन त्यामध्ये काही बदल असल्यास त्वरित बदल करुन माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेत यावी.

तसेच सदरची माहिती विनाविलंब अपलोड / अपडेट करणेकामी सर्व संबंधित विभागांना प्रशिक्षण देऊन लॉगिन, पासवर्ड यापुर्वीच देणेत आलेले आहेत. सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन पुन:श्च प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती त्वरित प्रसिद्ध / अद्ययावत करुन त्याबाबतचा अहवाल **दिनांक ०३/१०/२०२१** पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये सादर करणेत यावा. अहवाल वेळेत सादर न करणा-या विभागांचे विभागप्रमुखावर नियमाधिन योग्य ती कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तरी सर्व संबंधित विभागांनी उपरोक्त माहिती तातडीने / विनाविलंब प्रसिद्ध / अपडेट करुन अहवाल वेळेत पाठविणेची दक्षता घ्यावी.

**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी – १८**

प्रति,
सर्व संबंधित विभाग,